(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE : CCXXVI (226)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महिलांवरील अत्याचार | डॉ. विजय टोंगे | 1 |
| 2 | स्वामी विवेकानंद यांचे धर्म आणि भारत राष्ट्र याविषयीचे विचार | प्रा.विलास मेश्राम | 6 |
| 3 | महिला उत्पीडन आणि स्वामी विवेकानंद | प्रा. पंकज वा. मुन | 10 |
| 4 | स्त्री आणि घरगुती हिंसा | सुरेश महादेवराव देशमुख | 14 |
| 5 | कौटुंबिक हिंसाचार आणि महिला | डॉ. सुनिल शिंदे | 19 |
| 6 | ताण–तनाव : कारणे, परीणाम आणि उपाययोजना | प्रा. आदित्य कि. सारवे | 23 |
| 7 | कौटुंबिक हिंसाचाराचे समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | 27 |
| 8 | भारतीय कुटुंब व्यवस्था आणि घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ.राजेंद्र मुर्लिधरराव झाडे | 33 |
| 9 | मानवी हक्क आणि कौटुंबिक हिंसा | डॉ. प्रमोद माधवराव आचेगावे | 36 |
| 10 | जाहिरात : एक अध्ययन | डॉ. सुरेश बन्सपाल | 39 |
| 11 | कौटुंबिक हिंसाचाराची कारणे व उपाय | सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी | 43 |
| 12 | बदलत्या काळानुसार स्त्रीयांची बदलती वर्तणुक | प्रा.डॉ. छाया निलकंठ लंजे | 46 |
| 13 | घरगुती हिंसाचार — एक ऐतिहासिक विवेचन | डॉ. अनुश्री माहुरकर | 49 |
| 14 | कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण | डॉ. मदन जी. प्रधान | 52 |
| 15 | कुटूंबातील कुटूंबप्रमुख आणि घरगूती हींसा | सहा.प्रा. गिरिश गं. गवई | 56 |
| 16 | क्रिडाक्षेत्र व महिला | प्रा.धनंजय गिऱ्हेपुजे | 58 |
| 17 | कौटुंबिक हिंसाचारः भारतीय समाजात हुंडा पध्दत एक कारण | प्रा. चौधरी गोपाल विश्वनाथ | 60 |
| 18 | कौटुंबिक हिंसेतील भिन्नताः–पूर्वी व आता | प्रा.भूमिका आनंदरावजी कापगते | 62 |
| 19 | आजची संस्कृती आणि घरगुती हिंसाचार | प्रा.डॉ. सुनील पखाले | 65 |
| 20 | कौटुंबिक हिंसाचार : एक सामाजिक समस्या | प्रा. बळीराम वसंतराव पवार | 67 |
| 21 | नियतकालिके: बुध्दिजीवी समाजाची आवश्यकता | डॉ. पल्लवी साहेबराव काळे | 70 |
| 22 | महिलांच्या संदर्भात कौटुबिंक हिंसाचार आणि भारतीय कायदे | प्रा. रिता प्रेमदास खोब्रागडे | 73 |

# कौटुंबिक हिंसाचाराचे समाजशास्त्रीय विश्लेषण

प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, ता. बिलोली जि. नांदेड.
(मराठवाडा)पिन कोड: ४३१७३६

**सारांश (Abstract):**

स्त्रियांना आज मानसिक कौर्य व छळ तसेच शारीरिक कौर्य व छळ यास तोंड द्यावे लागत आहे. कौटुंबिक हिंसा (Domestic Violence) वाढते आहे. मात्र घरातील वाद, भांडणे, संघर्ष जे होतात त्यात स्त्री निर्दोषच असते असे मी म्हणणार नाही. घरातील भांडणात बऱ्याचदा स्त्रियांची पण चूक असते. अनेकदा पुरुषांची चूक असते. क्रुरतेची शिकार स्त्री जशी असते तशी स्त्रीपण कधी कधी क्रुर वागते. कुटुंबामध्ये स्त्री अपत्याचा जन्म पाप समजला जातो. आज तिला घरातूनच नव्हे तर गर्भातूनच काढले जाते. हे असे का घडते? मानसिक, शारीरिक छळामुळे स्त्रियांनाआत्महत्या करावी लागते. अशा आत्महत्येचे प्रमाण वाढते आहे. कांहीवेळा स्त्रिया आपल्या मुलांसह आत्महत्या करायला प्रवृत होतात. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा २००५ पास करुन तो नियम २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू करण्यात आला.

**सूचनक शब्द (keywords)**:कौटुंबिक हिंसा, गुन्हेगारी, सामाजिक समस्या, संघटीत हिंसा, योजनाबध्द हिंसा, हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार इत्यादी.

**प्रस्तावणा:**

भारतामध्ये आजघडीला अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. त्यामध्ये वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, हुंडा, बलात्कार, हुंडाबळी, बेरोजगारी, नैराश्य, दारीद्र्य, दहशतवाद, प्रदूषण, कॅसीनो कॅपीटॅलीझम (स्वैर भांडवलवाद), आणि कौटुंबिक हिंसाचार अशा अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. कौटुंबिक हिंसा सबंध भारतभर व महाराष्ट्रभर पहावयास व वर्तमानपत्रातून दर्शन होत आहे. भारतीय समाजव्यवस्थेत महिलांवर होणारे कौटुंबिक अत्याचार अनादी कालापासून ते आधुनिक कालखंडामध्ये देखिल कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. संयुक्त व विभक्त कुटुंबामध्ये महिलावरच अन्याय अत्याचार व हिंसेचे प्रमाण वाढत आहे. कौटुंबिक हिंसा ही प्रामुख्याने महिला व अठरा वर्षाखालील बालकावर अन्याय अत्याचार होत असल्याचे आढळून येते. कौटुंबिक हिंसाचारामध्ये स्त्रीचे शारिरीक, मानसिक व आर्थिक शोषण केले जाते तसेच लैंगिक छळ होत आहेत. उत्तर आधूनिकतेमध्ये देखिल हुंड्याच्या नावाखाली नववधूस जाळणे, उपाशी ठेवणे, अपमान करणे, टाकूण बोलणे इत्यादी प्रकारचे वर्तन कुटूंबामध्ये सर्रासपणे आढळून येते. ''आपल्याच कुटुंबात जेंव्हा एखाद्या महिलेला हिंसेचा सामना कराव लागतो तेंव्हा त्याला कौटुंबिक हिंसा असे म्हणतात. रक्ताच्या नात्यातील व्यक्ती, कायदेशीर दत्तकत्व, विवाह यासारख्यानात्यामध्ये असलेल्या व्यक्ती म्हणजेच पती, सासू, सासरे,आई, वडील, मुलगा, मुलगी, बहीण, भाऊ इत्यादी कोणी घरातील स्त्रीवर केलेले हिंसक कृत्य म्हणजे कौटुंबिक हिंसा. ही शारीरिक, लैंगिक, भावनिक आणि आर्थिक अशा कोणत्याही प्रकारची असू शकते.''[१]

अनादी काळापासुन भारतीय समाजात महिलांची स्थिती अनेक दृष्टीने दुय्यमत्वाचीच आहे, त्यामुळे भारतीय महिलांचा पुरुषांच्या बरोबरीने सर्वांगीण विकास होऊ शकला नाही प्राचीन

काळापासून ते आजपर्यंत भारतीय स्त्री ही अनेक दृष्टीने, मागासलेली अन्यायग्रस्त, अनिष्ठिरुढी परंपरेने जखडलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर काळात भारतीय स्त्रियेच समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी केल्याचे दिसत असले तरी त्यांची संख्या मोजकीच आहे. बहूतांश स्त्रीया आजही विविध स्वरुपाच्या अत्याचारास बळी पडत असल्याचे आपणास वृत्तपत्रातुन याचे विदारक चित्र अनुभवास येत आहे.आधुनिकयुगामध्ये कौटुंबिक हिंसेचे अध्ययन देश, विदेशातील विव्दानांनी संशोधनपर अध्ययन केले आहे. यापैकी उपलब्ध व विषयास अधिक समर्पक अशाच घटनांचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे. याच अनुषंगाने उपर्युक्त शिर्षकावरुन पुढील उद्दिष्टांना अनुसरुन केले आहे.

१. भारतीय समाजातील 'कौटुंबिक हिंसेचे' समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे.
२. 'कुटुंब' आणि 'हिंसा' यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.
३. संशोधनाव्दारे 'कौटुंबिक हिंसा' या संकल्पनेचे अध्ययन करणे.
४. उत्तर आधुनिकतेत 'कौटुबिक हिंसेचे' महत्व जाणणे.
५. संकलित माहितीचे विश्लेषण करणे.

संशोधनाची उद्दिष्टे समोर ठेवून अध्ययनात गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.

१. 'कौटुंबिक हिंसाचारामध्ये' स्त्रियांचा बळी जातो.
२. 'कौटुंबिक हिंसा' आर्थिक घटकामुळे घडते.
३. 'कौटुबिक हिंसा' होऊ नये यासाठी कायद्याची अत्यंत कडक अमंल बजावणी होणे आवश्यक आहे.

**शोधनिबंधाचे महत्व:**प्रस्तुत शोध निबंधाचे मुख्य उद्दिष्ट कौटुंबिक हिंसेचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन करणे. उत्तर आधुनिकतेत कौटुंबिक हिंसेचे महत्व जाणणे. त्यावरील उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आणि लोकशाहीतील स्वातंत्र्याची फळे कशी उपभोगता येईल व सबंध स्त्री समाजाचा विकास होईल याकडे लक्ष केंद्रीत असले पाहिजे. भारतीय समाजातील एक घटक म्हणून आपल्याला अभ्यासाद्वारे लक्षात येते. सदरील अभ्यासाचा उपयोग सामान्य अभ्यास, शासन यंत्रणा, स्त्री अभ्यासक, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते इत्यादींना होऊ शकेल.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग, नियतकालीके, शासकीय लेख, वर्तमानपत्रे, वैचारीक लेख, संकेत स्थळे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**कौटुंबिक हिंसा: वाढती समस्या**

स्त्री ज्या कुटुंबात राहते त्याच कुटुंबात त्यांना सुरक्षित वाटत नाही, हा एक महत्वाचा प्रकार झाला आहे. घरातच ती असुरक्षित आहे व हिंसेला सामोरे जाते आहे.ज्या घराला ती स्वता:चे घर मानते ते घरच आणि त्या घरातील आपली माणसे तिच्यावर आघात करतात. बाह्य जगाचा धोका सहन करणाऱ्या स्त्रीला अंतर्गत जगाचाही धोका अनुभवावा लागतो व तिला कुठेही सुरक्षिततेची हमी नाही, असे हे दुर्दैवी चित्र आहे. याबाबत न्या. सुजाता मनोहर यांनी म्हटले आहे की, "Recent surveys estimate that as many as 4 million women are victims of domestic violence each year and three quarters of all women will suffer some violent incident in their lifetime. Brutality by a spouse or a partner is the single major cause of injury to women. It cuts across lines of ethnicity, caste or sexual orientation. Yet we do not have any legislation dealing specifically with domestic violence. Complaints of violence within the family are often not registered at the police stations. If registered they are dropped." (Justice Sujata Manohar in 'Empowering the Indian Women',ed. Dr Kapur Promilla, Publication /Division, Govt. of India, New Delhio, 2001, Page 259 and 260). *'देशात दरवर्षी ४० लाख स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कौटुंबिक हिंसाचारास सामोरे जावे लागते आणि*

किमान एक तृतियांश स्त्रियांना आयुष्यात एकदा तरी कौटुंबिक हिंसेला बळी पडावे लागते आहे. ही परिस्थिती घरात किती अशांती, अस्वस्थता व अव्यवस्था आहे. हे लक्षात यायला पुरेसे आहे. अशा संघर्षग्रस्त घरांमध्ये अन्यायग्रस्त महिला राहतात. त्यांची शांती व सुख केंव्हाच हरविलेले असते, आणि त्यांना घराबाहेर पडणे शक्य नसते. 'इकडे आड तिकडे विहीर' अशी त्यांची अवस्था होते. त्यामुळे न्या. मनोहर म्हणतात, ज्याप्रमाणे कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हाच बहुधा नोंदविला जात नाही व नोंदविलाच तर केस मागे घेतली जाते''.[2] आपली कुटुंबव्यस्था स्त्रियांचा किती कोंडमारा नि छळ करु शकते व ती किती बिघडलेली ( Disordered) आहे हे यावरुन ध्यानात येते. घरातील सर्व घटकांना परस्परांशी सामंजस्याने कसे वागावे व रहावे याचेही शिक्षण देणे गरजेचे झाले आहे. घरातील हिंसाचाराने एक मर्यादा ओलांडल्यास स्त्रियांनी त्यांना समर्थपणे तोंड कसे द्यावे व मुकाबला कसा करावा, याबाबतही त्यांना जागृत करणे तितकेच महत्वाचे आहे. थोडक्यात,स्त्री परिवर्तनासाठी ज्या घराभोवती व घरामध्ये तिचे आयुष्य घडते ते घरच बदलले, परिवर्तित झाले तर समाज व स्त्री बदलेल असे वाटते.

''सामाजिक विषमता ही जात, धर्मआणि लिंग या तीन घटकावर आधारित आहे.पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तूआहे अशी पारंपारिक, प्रतिगामी मानसिकता आहे.स्त्रियांना शिक्षण सत्ता, संपत्तीचे सारे अधिकार नाकारण्यात आले होते. धार्मिक कायद्यांचा आधार घेवून स्त्रियांवर अधिकाधिक बंधने लादली गेलीच सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यासारख्या अनेक अन्यायकारक चालीरीतिनी लाखो स्त्रियांचे अवघे आयुष्यच करपून टाकले. भारतात ब्रिटीशांचे आगमन होईपर्यंत या निर्दयी प्रथा चालूच होत्या. ब्रिटीशकाळात जोतीबा फुले आणि सावित्रीबाई, राजा राममोहन रॉय यासारख्या भारतीय समाजसुधारकांची स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ आणि ब्रिटीशांचा स्त्री विषयक पाश्चात्य दृष्टीकोनामूळे ब्रिटीशांनी अनेक वाईट चालीरीती बंद करण्यासाठी कठोर कायदे केले.''[3]

घरातील मानसिक व शारीरिक छळामुळे स्त्रियांना आत्महत्या करावी लागते. अशा आत्महत्येचे प्रमाण वाढते आहे. काहीवेळा स्त्रिया आपल्या मुलांसह आत्महत्या करायला प्रवृत होतात. या सर्व घटनांमधून स्त्रियांचे समाजातील प्रमाण घटते आहे. कुपोषणाने बालमृत्यूमध्ये मुलींचे जास्त प्रमाण, स्त्रीगर्भहत्या होणे आणि स्त्रीभ्रूणहत्या जास्त होणे या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम स्त्रियांचे प्रमाण कमी होण्यात होतो आहे. आजही ''नको हा स्त्री जन्म''असे स्त्रियांना वाटते हे कशाचे द्योतक आहे. आपल्या स्त्री अपत्यास पुढे आयुष्यात त्रास होईल म्हणून त्याची हत्या आई करते हे उदाहरण आपल्याला काय सांगते? गर्भजल परीक्षा, कायद्याने (पीएनडीटी ॲक्ट) गुन्हा आहे. पण ती करणारे अशिक्षिताप्रमाणे सुशिक्षीत पालक आहेत. याचे उत्तर आपण काय देणार? गर्भजल चिकित्सेसारखी वैज्ञानिक सुविधा ही स्त्रियांना समाजातून, कमी करण्यासाठी व संपविण्यासाठी उपयोगी पडत आहे. विज्ञान स्त्रियांना उपकारक होण्याऐवजी घातक ठरते आहे. समाजाचे वर्तन असेच चालू राहिले तर समाजात स्त्रियांचे प्रमाण खूपच कमी होईल व त्यातून स्त्रियांवर अत्याचार वाढतील, छळांचे प्रमाण वाढेल आणि समाजाचा समतोलच नष्ट होईल. यातून अनेक सामाजिक व कौटुंबिक प्रश्न निर्माण होतील याचे पुरुषवर्गाने भान ठेवले पाहिजे. या बाबत जागृती निर्माण करणे हे स्वयंसेवी संस्था, माध्यमे व शिक्षण संस्था यांची जबाबदारी आहे असे मला वाटते.

''आधुनिक काळात जगण्यातील नीतिमूल्यांच्या घसरणीमुळे आणि वाढत्या औद्योगिक विकासामुळे स्त्रीच्या अवहेलनेत वाढच झाली. याशिवाय ज्या कुटुंबात अथवा घरात ती स्वत:ला सुरक्षित समजते त्याच तिच्या घरात ती कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडते आहे. या सर्व बाबींचा विचार करता आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्री अत्याचार व कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी अनेक

उपाय योजले गेले. भारतातही स्त्रीला कौटुंबिक हिंसाचारापासून सुटका मिळण्यासाठी 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा २००५' करण्यात आला''[४] ''कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने संसदेने २००५ मध्ये अधिनियम मंजूर केला व ऑक्टोबर २००६ पासून तसा कायदा संपूर्ण देशभर (जम्मू–काश्मीर वगळता देशातील सर्व राज्यांना) लागू झाला. या कायद्यामूळे महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देण्यात आले. स्त्रियांवर होणाऱ्या निरनिराळ्या अत्याचारापासून व कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करुन देण्यासाठी आजपर्यंत पुढीलप्रमाणे कायदे अस्तित्वात आहेत. भारतीय दंड विधान कायदा, १८६०, हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१, सती प्रथा विरोधक कायदा, १९८७, स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा, १९८६, घटस्फोट कायदा, १८६९, कुटुंब न्यायालय कायदा, १९८४, मुस्लिम महिलांसाठी कायदा, १९८६, गर्भलिंग परीक्षण व गर्भपात विषयक कायदा.''[५]

महिलांचे अत्याचार आता जास्त प्रमाणात वाढले आहेत. त्यांचे जीवन तर त्यामुळे विस्कळीत झाले परंतू त्यांच्या कुटुंबियांना पण त्याची झळ पोहोचते. एवढेच नाहीतर काही कुटुंबात कुटुंबियाकडूनच महिलांवर अत्याचार होताना दिसून येतात. भारतात महिला अत्याचाराचे प्रमाण वाढलेले आहे, त्याची आकडेवारी पुढील तक्त्यात दिली आहे.

महिलावरील अत्याचार (टक्केवारी)

तक्ता क्र.१

| राज्य | बलात्कार | अपहरण आणि पळवून नेणे | हुंडाबळी | पती व पतीच्या नातेवाईकाकडून झालेले अत्याचार | विनयभंग | लैंगिक अत्याचार (छेडछाड) | अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ५.५ | ५.९ | ६.५ | १२.६ | १३.३ | ३२.० | ११.३ | ३१.६ | १२.५ |
| बिहार | ४.४ | ७.७ | १५.४ | २.८ | १.९ | ०.१ | १.६ | १९.६ | ४.३ |
| गुजरात | २.० | ४.५ | ०.३ | ६.१ | १.९ | १.० | १.७ | ०.० | ३.९ |
| हरियाना | २.८ | २.६ | ३.४ | २.९ | १.२ | ५.५ | ३.६ | ०.१ | २.६ |
| कर्नाटक | २.४ | १.६ | ३.१ | ३.६ | ५.६ | ०.६ | १३.३ | १३.९ | ३.९ |
| केरळ | २.७ | ०.७ | ०.२ | ४.५ | ६.६ | ३.६ | १२.७ | ०.५ | ३.९ |
| मध्यप्रदेश | १४.० | ३.३ | १०.२ | ४.४ | १६.३ | ६.६ | ०.८ | १.४ | ७.८ |
| महाराष्ट्र | ६.९ | ३.६ | ४.१ | ८.६ | ८.३ | १०.० | ११.० | ०.८ | ७.४ |
| पंजाब | २.४ | २.० | १.५ | १.२ | ०.८ | ०.३ | २.४ | ०.१ | १.३ |
| राजस्थान | ७.१ | ९.० | ५.२ | ११.६ | ६.४ | ०.२ | २.५ | १.७ | ८.५ |
| तामिळनाडू | २.८ | ४.४ | २.३ | १.६ | ३.२ | ४.६ | २८.९ | ३.२ | ३.० |
| उत्तरप्रदेश | ८.२ | १९.७ | २६.६ | ९.६ | ७.२ | २२.९ | १.६ | ४.२ | ११.४ |
| पश्चिमबंगाल | १०.९ | ८.५ | ६.० | १८.० | ५.० | १.० | २.५ | ०.८ | ११.४ |
| दिल्ली | २.२ | ६.४ | १.७ | १.४ | १.४ | १.१ | १.१ | ०.१ | २.१ |
| भारत | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |

(आधार: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१०–११)

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, भारतातील महिलावर होणाऱ्या अत्याचारा संबंधी विविध राज्याची स्थिती पाहिली असता बलात्काराच्या बाबतीत मध्यप्रदेश (१४.१ टक्के) प्रथम क्रमांकावर आहे तर त्याखालोखाल पश्चिम बंगाल (१०.९ टक्के) राजस्थान (७.१ टक्के) महाराष्ट्र (६.९ टक्के) म्हणजेच चौथ्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. अपहरण आणि पळवूण नेणे यामध्ये महाराष्ट्राचे प्रमाण(३.६टक्के) आहे. हुंडाबळी संदर्भात प्रमाण (४.१ टक्के) आहे. सर्वात जास्त हुंडाबळी उत्तरप्रदेश (२६.६ टक्के) आहे. त्याखालोखाल बिहार व मध्यप्रदेशचा क्रमांक लागतो. पती व पतीच्या नातेवाईकाकडून झालेल्या अत्याचाराच्या बाबतीत महाराष्ट्रातील प्रमाण (८.६ टक्के) आहे. तर सर्वात जास्त पश्चिम बंगाल (१८.०० टक्के) राज्याचे आहे. तसेच

विनयभंग महाराष्ट्रात(८.३ टक्के), लैंगिक अत्याचार (१० टक्के), अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा (११ टक्के), आणि इतर अत्याचार (०.८ टक्के) असल्याचे महाराष्ट्रातील एकंदरीत परिस्थिती आहे.

महाराष्ट्रातील स्त्रीयांवरील अत्याचार:

तक्ता क्रमांक २.

| **गुन्ह्याचे शिर्षक** | **वर्ष** | | |
|---|---|---|---|
| | **२००७** | **२००८** | **२००९** |
| पती व पतीच्या नातेवाईकाकडून अत्याचार | ७३५६ | ७८२९ | ७६८१ |
| विनयभंग | ३३०६ | ३६१९ | ३१९६ |
| बलात्कार | १४५१ | १५५८ | १४८३ |
| आत्महत्येस प्रवृत करणे | १३५९ | १३३३ | १२०० |
| लैंगिक अत्याचार | १०३९ | १०९१ | १०९९ |
| अपहरण आणि पळवून नेणे | ९६७ | ९९८ | ९२६ |
| हंडाबळी | ४३६ | ३९० | ३४१ |
| हंड्यासाटी खून | १९२ | १७५ | २१७ |
| हुंड्यासाठी खूनाचा प्रयत्न | १३५ | १४० | १५५ |
| इतर | ३६९ | ३७७ | ३२२ |
| एकूण | १६६१० | १७५१० | १६६२० |

(आधार: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१०–२०११)

तक्ता क्रमांक २ मध्ये २००७ ते २००९ या कालावधीतीलवेगवेगळ्या गुन्ह्याचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, २००८ मध्ये पती व पतीच्या नातेवाईकाकडून सर्वात जास्त ७८२९ अत्याचार गुन्हे झाले होते. विनयभंग २००८ मध्ये ३६१९ गुन्हे, बलात्कार १५५८, अत्याचार झाले. तर २००७ मध्ये १३५९ सर्वात जास्त गुन्हे आत्महत्येस प्रवृत करण्यास झाले. लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत सर्वात जास्त २००९ मध्ये १०९९ गुन्हे झाले आहेत. अपहरण आणि पळवून नेणे २००८ मध्ये सर्वात जास्त ९९८, तसेच हुंडाबळी २००७ मध्ये ४३६ गुन्हे झाले होते.हुंड्यासाठी २१७ खून २००९ मध्ये झाले होते. तसेच हुंड्यासाठी खुनाचा प्रयत्न सर्वात जास्त २००९ मध्ये १५५ गुन्हे नोंद आहे. आणि इतर अत्याचाराच्या संदर्भात २००८ मध्ये ३७७ गुन्हे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

**निष्कर्ष**:भारतात स्वात्रंत्र्योत्तर कालखंडा स्त्रीच्या दर्जात सुधारणा झाली आहे. परंतु तिला पुरुषांच्या बरोबरीचा समान दर्जा आजही प्राप्त झाला नाही ही वास्तविकता मान्य करावी लागेल. कायद्याने मान्य केलेले स्त्री–पुरुष समानतेचे तत्व व्यवहारात पुर्णपणे रुजलेले नाही, परंतु कायद्याची अमंलबजावणी मात्र प्रभावीपणे होऊ शकली नाही. कायद्याच्या अंतर्गत अनेक पळवाटा असल्याने स्त्रियांनी न्याय, समता मिळवुन देण्यात कायदे अपयशी ठरली आहेत. आजही बालविवाह मोठ्या प्रमाणात होतात, हुंड्यामुळे आजही छळ केला जातो आहे, आजही महिलांना कौटुंबिक अत्याचार सहन कराव लागतो, अनेक विधवा स्त्रीयांना अपमानीत जीवन जगावे लागते आहे, शुल्लक कारणावरुन घटस्फोट देऊन स्त्री बेघर होते, पाशवी नजरेच्या बळी जाणाऱ्या स्त्रीयांची आजही अवहेलना होते आहे. आजही मुली पेक्षा मुलाला कुटुंबात अधिक महत्व दिले जाते. मुलगी गर्भात आहे हे कळताच सुशिक्षीत व्यक्ती सुध्दा त्या महिलेस भृणहत्या करण्याची बळजबरी केले जाते. स्त्रीयांचे दुय्यमत्वाचे व अवहेलनेचे चित्र बदलायचे असेल तर स्त्री सुध्दा आपल्या सारखीच व्यक्ती आहे, याचा स्वीकार भारतातील प्रत्येक व्यक्तीने करावा. तीला सुध्दा माणूस म्हणून हक्क आणि अधिकार आहेत याची जाणीव ठेवावी. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोण जो पर्यंत बदलत नाही तो

पर्यंत कितीही कायदे केले, प्रबोधन केले तरीही त्याचा उपयोग होणार नाही. स्वत: स्त्रीने सुध्दा आपल्यावर होणारा अन्याय सहन न करता तयाचा प्रतिकार केला पाहिजे.

**संदर्भ:**


१. https://www.violencenomore.in 01/03/2020.am
२. गोटे शुभांगी, २००३, *'स्त्री परिवर्तनाची आव्हाने'* औरंगाबाद: साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, पृ. १७
३. https://mr.m.Wikipedia.org01/03/202010.45.am
४. कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा २००५, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई, पृ. ६.
५. कित्ता, पृ. ७.
६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१०–११